**सं. फौ. ख. क्र. २३०/२०२४**
**शासन वि. दिनेश चरडे**
**CNR: MHWR090003742024**
**(न्यायनिर्णय नि. १२ च्या पुढे सुरु)**

## न्यायनिर्णय

सदर प्रकरणातील अभियोगपक्षाचे कथन व पुरावा लक्षात घेता माझ्या समक्ष खाली मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झाले असून त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. अभियोपक्ष हे सिध्द करतो काय कि, दि. २५/०३/२०२४ रोजी ११.३० ते १२.०० वाजताचे दरम्यान मौजा ठाणेगांव बस स्टॉप जवळ, ता. कारंजा घा. जि. वर्धा येथे आरोपी दारू पिवून दारूच्या नशेत सार्वजनिक ठिकाणी असभ्यतेचे वर्तण करून येणा-या जाणा-या लोकांना शिवीगाळ करीत आढळून आले व त्याप्रमाणे आरोपीने मुंबई दारूबंदी अधिनियम कलम-८५ (१) प्रमाणे गुन्हा केलेला आहे ? | **...नाही...** |
| २. आदेश काय ? | **निर्दोष मुक्तता** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ बाबतः-**

२. आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षाने पंच- मिलींद गणपतराव दार्वेकर (अ.सा.१) व सागर सुरेशराव भांगे (अ.सा.१) यांना तपासले. त्यांच्या पुराव्यात अभियोग पक्षाला सहकार्य करण्यासाठी कोणताही मजकुर न आल्यामुळे नि.क्र.१ वरील आदेशानुसार अभियोपक्षाच्या पुराव्याची बाजु बंद करण्यात आली आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा न आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये बयान नोंदविण्यात आले नाही.

३. मिलींद गणपतराव दार्वेकर (अ.सा.१) व सागर सुरेशराव भांगे (अ.सा.१) या दोन्ही साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात पोलिसांनी त्यांना

पंचनाम्यासाठी बोलवले नव्हते तसेच त्यांच्या समक्ष कोणताही पंचनामा तयार करण्यात आला नाही असे सांगितले आहे. सदर साक्षदारांचा सरतपास न्यायालयामार्फत नोंदविण्यात आला होता. तेव्हा सदर साक्षदारांनी स्पष्टपणे नाकारले की आरोपी दिनेश चरडे हा घटनास्थळी सार्वजनिक ठिकाणी दारू पिवून धामधूम करतांना मिळून आला. त्यांच्या पुराव्यात अभियोग पक्षाला मदत होण्याच्या दृष्टीने काहीही महत्वपूर्ण आले नाही. त्यामुळे सदरील साक्षीदाराची साक्ष अभियोगपक्षास उपयुक्त ठरत नाही.

४. उपरोक्त पुराव्यावरुन घटनास्थळावर नेमके काय घडले याबाबत स्वतंत्र पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. अभियोपक्षाने पंचनामा सिध्द केलेला नाही. स्वतंत्र पंच साक्षदारांनी सहकार्य न केल्यामुळे अभियोग पक्ष सदर बाब सिध्द करू शकले नाही. एकंदरीत आरोपी दारू पिवून दारूच्या नशेत सार्वजनिक ठिकाणी असभ्यतेचे वर्तण करून येणा-या जाणा-या लोकांना शिवीगाळ करीत आढळून आले होते हे सिध्द होत नाही. सबब पुराव्या अभावी आरोपीचा गुन्हा सिध्द होत नसल्याने मी मुद्या क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी दर्शविते व त्याप्रमाणे निष्कर्ष देते.

**<u>मुद्या क्रमांक २ बाबत</u>**

५. अभियोपक्षाने आरोपीचा गुन्हा सिध्द करण्यासाठी सबब विश्वसनीय व संयुक्तीक पुरावा सदरच्या खटल्यामध्ये आणलेला नाही त्यामुळे आरोपी विरुध्दच्या गुन्हा सिध्द होत नसल्याने तो निर्दोषमुक्ततेस पात्र ठरतो.

६. सबब मुद्या क्रमांक २ चे अनुषंगाने पुढील अंतिम आदेश पारीत करण्यात येते.

सं. फौ. ख. क्र. २३०/२०२४
शासन वि. दिनेश चरडे
CNR: MHWR090003742024
(न्यायनिर्णय नि. १२ च्या पुढे सुरु)

## आदेश

१. आरोपी दिनेश शेषराव चरडे यांना फौजदारी प्रकिया संहितेच्या कलम २५५ ( १ ) अन्वये महाराष्ट्र दारु प्रतिबंधक अधिनियम, १९४९ चे कलम-८५ ( १ ) या गुन्हयामधून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीची वैयक्तिक जमानत व जमानतीचे बंधपत्र रद्य करण्यात येते.

३. आरोपीने फौजदारी प्रकिया संहिता कलम ४३७ (अ) प्रमाणे स्वतःचे रु. १५०००/- चे वैयक्तिक बंधपत्र दाखल करुन पुर्तता करावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारीत व घोषित करण्यात आला.)**

DIKSHA DINESH VIGHNE
Digitally signed by DIKSHA DINESH VIGHNE
Date: 2026.08.03 18:02:10 +0530

(दिक्षा दि. विघ्ने)

वर्धा. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

दिनांक : ०३–०८–२०२६ कारंजा घा.